४७१/c

5 OCT 2006
४१६४

क्र. उसं/रसायन/सक्षम अधिकारी कार्यभार/संकिर्ण/२००६/पी-५८४२
उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- ३०.०९.२००६

**विषय :- महाराष्ट्र राज्यातील वंगण तेले, त्यांचे उत्पादन व वंगणतेलावरील प्रक्रिया करणाऱ्या घटकांचे अनुज्ञाप्तीसाठी "सक्षम अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्याबाबत.**

संदर्भ :- १) केंद्र शासनाच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालयाचे आदेश दिनांक २०,०३.१९८७
२) उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचा शासन निर्णय क्र. एमएससी-१०८७/(५२९३)/उद्योग-१८, दिनांक ०३.०९.१९८७
३) राज्य शासन शुध्दीपत्रक उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. एमएससी-२००४/५२५५२/(८१६१)/उद्योग-१८, दिनांक ०२.११.२००४

- : <u>आ दे श</u> : -

माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जनतेशी थेट संपर्क साधून जलद व सुलभ रितीने विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टोने जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे येथील "उद्योग सेतू" कार्यपध्दती अवलंबन महाराष्ट्रातील सर्व जिल्हा उद्योग केंद्रात राबविण्याची संकल्पना अंमलात आणावयाची आहे, त्यामुळे कालापव्यय टाळून किमान कालावधीत उद्योजकांना एकाच ठिकाणी मार्गदर्शन व परवाने इ. बाबी सुलभतेने मिळतील या उद्दीष्टांची पूर्तता होण्याच्या दृष्टोने वंगण तेले व ग्रीस तसेच वंगणतेलावर प्रक्रिया करणाऱ्या घटकांचे अनुज्ञाप्ती मंजूर करण्याचे अधिकार प्राधिकृत करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

केंद्र शासनाच्या संदर्भिय क्र. १ वरील आदेशाच्या अनुषंगाने राज्य शासनाने संदर्भ क्र. ३ च्या शुध्दीपत्रकानुसार विकास आयुक्त (उद्योग) सर्व विभागीय उद्योग सह संचालक व अधिक्षकीय उद्योग अधिकारी, नांदेड यांना वंगणतेले व ग्रीस यांचे उत्पादन व त्यावरील प्रक्रिया तसेच नुतनीकरण यासाठी मंजूरी देण्याकरिता <u>"सक्षम अधिकारी"</u> म्हणून त्या आदेशान्वये प्राधिकृत करीत आहे.

उत्पादीत घटकांस वंगणतेले व ग्रीस, नवीन अनुज्ञाप्ती मंजूरी तसेच अतिरिक्त उत्पादनांचा मुळ अनुज्ञाप्तीत समावेश करण्याबाबतच्या प्रकरणी संबंधित घटकांच्या कारखान्यांची तेल कंपनीचे (बीपीसीएल, एचपीसीएल, आयओसीएल) तांत्रिक अधिकारी व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी संयुक्त तपासणी करावी तसेच अनुज्ञाप्तीचे नुतनीकरण प्रकरणी <u>फक्त जिल्हा कार्यालयाने घटकांस भेट द्यावी.</u>

(डॉ के. शिवाजी)

shin. - टप्पल
7

B
4/10/06.

प्रत कार्यवाहीस्तव सादर :

१) उद्योग सह संचालक,मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई /ठाणे /पुणे /नाशिक/औरंगाबाद /नागपूर अमरावती
२) अधिक्षकीय उद्योग अधिकारी, उप विभाग, नांदेड
३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, (सर्व )

प्रत अवलोकनार्थ सादर :

सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.